| | |
|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोननं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

**प्रेसनोट क्रमांक :- ३०४** **दिनांक :-२९/१०/२०२१**

## २२ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगणाऱ्या ईसमावर अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची कारवाई

अंमली पदार्थ विरोधी कक्ष मिरा- भाईंदर, वसई- विरार आयुक्तालय यांना दि.२७/१०/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, उत्तन धावगी डोंगरी भाईंदर (पश्चिम) येथील लालबहादुर शास्त्री नगर कचरा डेपो कडे जाणाऱ्या रोडवर एक ईसम त्याचे कब्ज्यात मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बाळगुन विक्री करीत असतो.

सदर मिळालेल्या बातमीचा आशय वरिष्ठांना कळवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करुन एकुण २२ ग्रॅम वजनाचा व १,१०,०००/-रु.किंमतीचा मॅफेड्रॉन पदार्थ ईसम नामे शहाबाज आसिफ खान ऊर्फ बबलु वय २३ वर्षे याचे कब्ज्यात मिळुन आला. सदर अंमली पदार्थ मॅफेड्रॉन जप्त करण्यात आलेला असुन अरोपीत यास ताब्यात घेउन कारवाई करण्यात आली आहे. नमुद आरोपीविरुध्द उत्तन पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ।। १८८/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक, श्री. देवीदास हंडोरे, स.पो.नि.विलास कुटे, म.स.पो.नि. तेजश्री शिंदे नेम. भरोसा सेल,पो. हवा. धनाजी इंगळे,पो.ना.पवन पाटील, पो.शि. अजय यादव, विष्णुदेव घरबुडे, आफरीन जुनैदी नेम. भरोसा सेल यांनी केली आहे.

------oooooo------